# ''लोकदैवत श्रीक्षेत्र धुळदेवचे ऐतिहासिक महत्त्व''

**एस. एम. गावडे**

इतिहास विभाग प्रमुख मुधोजी महाविद्यालय, फलटण जि.सातारा

## सारांश :

सातारा जिल्हयातील फलटण तालुक्यात विविध जातीधर्माचे लोक वास्तव्य करतात. त्यांच्या जीवनपध्दतीत विविधता आढळते. फलटण तालुक्याचा राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक वारसा फार मोठा आहे. सध्याचा फलटण तालुका हा पूर्वीचे फलटण संस्थान होते. या संस्थानची स्थापना इ.स.१२८४ मध्ये निंबराज पवार(परमार) याने केली. फलटण हे नाईक निंबाळकर यांचे संस्थान होय. या नाईक निंबाळकर घराण्यात एकुण २५ राज्यकर्ते होवून गेले. या संस्थानचे सर्व सत्ताधिश सहिष्णूवादी असल्याने संस्थानात सर्व धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहत होते[१]. त्यामुळे फलटण तालुक्यात सर्व धर्माची मंदिरे आपणास पहावयास मिळतात.

## प्रस्तावना :-

फलटण शहरात हिंदू मंदिरे, महानुभाव मंदिरे, जैन मंदिरे आहेत. तसेच फलटण परिसरामध्ये जावलीचे सिध्दनाथ मंदिर, निंबळकचे निमजाई मंदिर, राजाळयाचे जानाई मंदिर, कांबळेश्वरचे भिवाईचे मंदिर, धुळदेवचे धुळोबाचे मंदिर, ही सर्व मंदिरे,आपणास पाहावयास मिळतात. ही सर्व मंदिरे प्राचीन असून फलटणच्या प्राचीनतेची साक्ष देतात[२]. धुळदेवचे मंदिर, फलटण शहरापासून पुर्वेला आसू रोडवर ३ कि.मी.अंतरावर आहे. मी या शोधनिबंधामध्ये फलटण तालुक्याचे लोकदैवत धुळोबा मंदिराचे ऐतिहासिक महत्त्व याबद्दल सविस्तर माहिती दिलेली आहे.

## धुळदेव मंदिर :–

**पूर्व इतिहास :–** फलटण नगरीपासून हारळया डोंगर थोडा दूर आहे. हारळया डोंगरावर 'कमळू' नावाचा धनगर राहत होता.[३] त्याच्या बायकोचे नांव 'भानूबाई' होते. दोघांचा संसार हरळया डोंगरावर मेंढरासमवेत आनंदात चालला होता. निसर्गाचे सानिध्य व परमेश्वराची कृपा या दोन्ही गोष्टी त्यांना घडवत होत्या. कमळू व भानूला मुलबाळ नव्हते. दररोज पहाटे उठायचे मेंढरं वाडयातून बाहेर काढायची अखरावर बसवायची. परमेश्वराची आरोळी ठोकायची. भोळी भाबडी भक्ती करायची. कमळू–भानू यांच्या हृदयात देव बसत होता. परमेश्वर दयेने ते दोघे जगत होते. ध्यानी, मनी, चित्ती, परमेश्वराच रूप आठवत होते.

 ISSN:-2347-2723

कमळू शिंदे व भानूबाई यांचा परमेश्वर प्राप्तीत देह रमून गेला होता. परमेश्वर लिल्यानुसार भानूबाईला दृष्टांत झाला. ती सकाळी उठल्याबरोबर कमळू शिंदेना म्हणते ''आज मला वाटतं भल्या चार पाच पोती गवऱ्या गोळा कराव्यात. त्यांचा उंच हुडवा करावा. पुरणपोळीचा स्वयंपाक करावा. होळी पेटवावी आपण दोघांनी होळीच्या भोवती बोंबलावे.'' हे संपूर्ण ऐकल्यावर कमळू शिंदे गडबडून गेला. असली कसली तुझी ही वेगळीच पध्दत आहे. असं करणं बरे नाही. सगळा धनगर समाज गोळा होईल. आपणास बोल ठेवेल असं कमळू म्हणू लागला. अशा वेळी भानूबाईने हट्ट धरला. कमळूने हट्टाला दाद दिली. दोघांनी ठरल्याप्रमाणे काम करण्यास सुरूवात केली. होळी पेटवली. नैवेद्य दाखवला. व घरी दोघेही निघून आले. घरी आल्यानंतर जेवले व झोपले त्यावेळी भानूबाई कमळाजीस म्हणते, ' आता झोपायचं, लवकर उठायचं, आपण दोघांनी पाण्याच्या घागरी घ्यायच्या असेंच विहीरीवर जायचे. दोघांनी पाण्यात बुडी मारायची. दोघांनी ओल्या पडद्याने दोन पाण्याच्या घागरी आणायच्या. होळीला पाणी घालायचे. त्या होळीतील जळलेल्या शेणकुटाची राख भिजल्यावर त्याची 'राड' करायची आणि तुम्ही माझ्या अंगावर टाकायची. मी तुमच्या अंगावर राड टाकली असे म्हणल्याबरोबर कमळू चिंताग्रस्त झाला. म्हणाला,''जशी डमरूवाल्याची कृपा होईल तसे केले पाहिजे.''

सकाळी लवकर दोघेही उठले. दोघांनी दोन पाण्याच्या घागरी घेतल्या. भरा—भरा पाणी आणण्यासाठी पाऊले उचललू लागली. होळी जवळून जात आहे. तेवढयात काय आश्चर्य होळीपासून जाताच त्या आवारात मुल हातपाय झाडून खेळत होते. तेवढया कमळूची नजर त्या मुलावर गेली. त्याने तिथेच घागर टाकली व मुल उचलून घेतले. कमळू फलटण नगरीत फिरू लागला. परंतू कोणीच त्याला ओळखले नाही. कमळूने त्याला भानूकडे देताच भानूला पान्हा फुटला. ते मुल तिला पिऊ लागले. दिसामासंन वाढू लागलं. त्याचे नाव त्यांनी धुळीत सापडला म्हणून धुळोबा हे ठेवलं. याच धुळोबाचे मंदिर धुळदेव या गावी आहे.

**खंडयासुराचा वध :—**

शंभू महादेव हे भक्तांच्या समस्यांचे चिंतन करीत बसले होते. हे चिंतन करीत असताना हातांनी पाठ—पोट चोळत होते. अंग चोळताना अंगातून जो मळ निघत होता. त्याचा गोळा करून त्यापासून सुंदर मूर्ती तयार केली व ती मूर्ती देवी पार्वतीस दाखवली. पार्वतीने त्या मूर्तीस जिवंत करण्याचा हट्ट धरला. त्यामुळे शिवशंकरांनी तिला जिवंत केले. तोच तो खंडयासूर होय.[४] हा खादाड होता. तो शंकराच्या भक्तांना हडप करू लागला. त्यावेळी भगवान शंकरांनी धुळोबांना ही कामगिरी सोपविली. धुळोबा व खंडयासुरात युध्द सुरू झाले. पण खंडयासुराचे दैत्य मारले तरी जिवंत होत होते तेव्हा धुळोबांनी आपली बहीण भिवाईस आव्हान केले ती धावून आली. विद्येच्या जोरावर भिवाईने घारी, विंचू सोडले व सर्व दैत्य मारून टाकले. तेव्हा धुळदेव व खंडयासूर समोरासमोर आले. व घनघोर युध्द झाले. त्यात खंडयासुरास धुळोबाचा भाला लागल्यामुळे तो खाली पडला. धुळोबांनी तलवार उगारली तेव्हा खंडयासुर म्हणाला, '' देवा मला मार पण तुज्या पुढची कोकरे बकरी मला दे.[५]'' माझां धड बगाडा खाली पूर व शिर तुझ्या पायाखाली पूर देवानी कबूल केले व त्याचा वध केला. आज ही मंदिराबाहेर खंडयासूरास कोकरे कापली जातात.

**रचना :—**

हे मंदिर धुळदेवाचे असून ते पुर्वाभिमुख आहे. मंदिराच्या विधानचे तीन भाग पडतात. गाभारा, मंडप, मुखमंडप. गाभारा हा चौरस असून यावर उभे रथ आहेत. गाभारा आतून ९ चौ.फूट असा आहे. गाभाऱ्यात दगडी फरशी आहे. गाभाऱ्याच्या मध्ये शिवलिंग आहे. गाभाऱ्यात एक मीटर दगडी उंच आसनावर धुळोबा, मिताबाई व अज्ञान बाळे यांची मूर्ती बसविलेली आहे. गाभाऱ्याचे छत त्रिकोणी पध्दतीचे आहे. प्रवेशद्वाराच्या ललाटबिंबावर गणेशाची मूर्ती तर उंबरठ्यावर किर्ती मुख आहे. गाभाऱ्याचे बाहेर मंडप आहे. मंडप हा दोन फूट उंच दगडी जोत्यावर उभा आहे. त्याची लांबी ३१ फूट व रूंदी २७ फुट अशी आहे. हा मंडप बंदिस्त असून याला दक्षिणेकडे एक प्रवेशद्वार आहे. याची उंची ५ फूट व रूंदी ३.५ फूट आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या ललाटबिंबावर गणेश तर उंबरठ्यावर किर्ती मुख आहे. मंडपामध्ये डाव्या व उजव्या बाजूस देवास झोपण्यासाठी पलंग आहेत. मंडपातील स्तंभाची रचना यादव कालीन स्तंभ रचनेप्रमाणे आहे. स्तंभावरील हस्तावर नागफणा, यक्ष, यांच्या नक्षी कोरलेल्या आहेत. मंडपातील स्तंभाची उंची ९ फूट उंच अशी आहे. मंडपामध्ये देवांच्या घोड्यांच्या मूर्ती आहेत. यामध्ये डावीकडच्या घोडयावर धुळोबा यांची मूर्ती आहे. मंडपामध्ये दगडी कासव आहे. मंडपाच्या बाहेर मुखमंडप आहे. हा दोन पूर्ण स्तंभावर उभा आहे. मुखमंडपातील देवकोष्टकात गणेशाची मूर्ती आहे. मुखमंडपातील स्तंभांची उंची ९.५ फूट उंच आहे. मुखमंडपापुढे नवीन पध्दतीने बांधलेला सभामंडप आहे. याची लांबी १८ फूट व रूंदी २६ फूट अशी आहे. हा ८ खांबावर उभा आहे. याचे बांधकाम वीट, वाळू, सिमेंटमध्ये केलेले आहे. या मंदिरावर हेमांडपंथी पध्दतीचे छाप दिसते. गाभाऱ्यावर उभे रथ आहेत. ते सलग वर न जाता क्रमाक्रमाने लहान होत वर जातात. गाभाऱ्याच्या बाहेरील भिंतीत देवकोष्टके आहेत. त्यामध्ये मूर्ती नाहीत. शिखराची उंची साधारण ४० फूट असावी. शिखरावरील मजले स्पष्ट दिसतात. या मजल्यावर शिखराच्या प्रतिकृतीचे हार आहेत. वरती मोठा घुमट आहे. अशी रचना शिखराची आहे. शिखरावर द्रविड पध्दतीची छाप दिसते. मंदिराचे चारही बाजूस तटबंदी आहे. उत्तरेस मुख्य प्रवेशद्वार आहे. तसेच पूर्वेस, दक्षिणेस, पश्चिमेस लहान प्रवेशद्वार आहे. मंदिरासमोर दिपमाळ आहे. त्यावर गजमुख प्रकारचे हस्त आहेत. मंदिराबाहेर खंडयासूराची मूर्ती आहे.

**जत्रा —**

चैत्र महिन्यात धुळदेवाची जत्रा भरते. भव्य गर्दी असते. पहिला मान कांबळेश्वर येथील निरा नदीकाठी डोहाजवळ बसलेल्या भिवाईचा असतो[६]. त्यानंतर जत्रा फलटणच्या पूर्वेस दिड कि.मी.अंतरावर धुळदेववाडी येथे धुळोबाची मोठी जत्रा भरते. आदल्या धुळदेवाला पुरणपोळीचा नैवेद्य असतो. दुसऱ्या असूरांस (खंडयासूरास) बकरी कापली जातात. अशा पध्दतीची जत्रा धुळदेवांची असते. जत्रेमध्ये धनगरी ओव्या, भेदिक, भाकनुक हा कार्यक्रम असतो. हे देवस्थान जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. धुळदेव हा नवसाला पावणारा देव आहे. भक्तजनांना एखादे कार्य करावयाचे असल्यास ते धुळदेवाला नवस बोलतात. तसेच आपली मनोकामना पूर्ण होण्यासाठी भक्तजन देवाला कौल लावतात. काही भक्तजन दर महिन्याच्या अमावस्येला आणि पौर्णिमेला दर्शनासाठी न चुकता येत असतात[७]

**संदर्भसूची**

1. बाळासाहेब पाटील, सत्यवादी विशेष अंक , दक्षिणेतील संस्थाने, जुलै १९४०.
2. मिराशी वि.वी.शिलाहार घराण्याचा इतिहास व कोरीव लेख पृ.५
3. वाघमोडे पांडुरंग रामजी, श्री तीर्थक्षेत्र, धुळदेव, २००२, पृ.१३
4. कित्ता पृ.३१.
5. कित्ता, पृ.३३
6. राजवाडे वि.का. मराठ्यांच्या इतिहासाची साधने १९१५ खंड–२०, शिवकालीन घराणे भा.इ.स.मंडळ, पुणे–पृ.३९९.
7. मुलाखत, प्रा.अनिल शिवाजी टिके.